जा.क्र.मनपा/आरोग्य/एएनएचएम/२०१९/ 1876
दिनांक : 19/03/२०१९.

# राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान
# औरंगाबाद शहर आरोग्य समिती

महानगरपालिका, औरंगाबाद.

## अर्धवेळ वैद्यकीय अधिकारी (Recruitment) पद भरती जाहिरात

**-:जाहिरात:-**

औरंगाबाद शहर आरोग्य समिती, महानगरपालिका औरगाबाद अंतर्गत आरोग्य विभागा मार्फत अर्धवेळ वैद्यकीय अधिकारी पदे तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने भरण्या करिता मुलाखतीचे आयोजन करण्यात आलेले आहे. अर्हताधारक उमेदवाराकडून विहीत नमुन्यात टंकलिखीत स्परुपात अर्ज विहीत कागदपत्रासह मागविण्यात येत आहेत.

**(१) रिक्त पदाचा तपशील :-**

| अ.क्र. | पदनाम | एकुण पदे | एकुण ठराविक वेतन |
|---|---|---|---|
| ०१ | अर्धवेळ वैद्यकीय अधिकारी विशेष तज्ञांना प्राधान्य ६ पदे (आरक्षण लागु नाही) | एकुण पदे ६ (आरक्षण लागू नाही) | रु.२८३५०/- प्रतिमहा सेवानिवृत्त अधिकारी यांना शासनाच्या नियमानुसार परंतु रु.२८,३५०/- पेक्षा जास्त मानधन अनुज्ञेय नाही. |

**(२) अर्धवेळ वैद्यकीय अधिकारी पदासाठी पात्रता :-**

१. शैक्षणिक अर्हता - एमबीबीएस आणि पदव्युत्तर पदवी किंवा पदविका उत्तीर्ण असावा अथवा उमेदवार प्राप्त न झाल्यास एमबीबीएस उमेदवारास ग्राहय धरण्यात येईल.
२. महाराष्ट्र मेडिकल कॉन्सिलची नोंदणी/ नूतनीकरण बंधनकारक राहील.
३. अनुभव - शासकीय/ निमशासकीय/ स्थानिक स्वराज्य संस्था / राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत असणारा अनुभव ग्राहय राहील.
४. अर्जाचा नमुना www.aurangabadmahapalika.org या महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

**(३) वयोमर्यादा - कमाल ६० वर्षे पर्यंत**

**(४) अर्धवेळ वैद्यकीय अधिकारी यांच्या सेवेबाबतच्या सूचना :-**

- अर्धवेळ वैद्यकीय अधिकारी यांची सेवा शहरी प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये आठवडयातून ६ दिवस उपलब्ध करुन घ्यावी.
- त्यांना जास्तीत जास्त रु.२८,३५०/- पर्यंत मासिक मानधन देण्यात यावे.
- यांची सेवाही दिवसातून जास्तीत जास्त ४ ते ५ तास किंवा रुग्ण तपासणी संपेपर्यंत उपलब्ध करुन घ्यावी.
- सदर अर्धवेळ वेद्यकीय अधिकारी यांनी OPD बघावी.
- सर्व राष्ट्रीय कार्यक्रम राबविणे. आवश्यकतेनुसार आरोग्य सेवा देणे.

**(४) अर्ज स्वीकृती व मुलाखतीचे वेळापत्रक :-**

| अ.क्र | बाब | दिनांक | वेळ | स्थळ |
|---|---|---|---|---|
| ०१ | अर्ज स्वीकृती | ०४ /१०/२०१९ | सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत | औरंगाबाद शहर आरोग्य समिती, डाटा सेंटर, सिटी मार्व्हेल बिल्डींग, औरंगपुरा औरंगाबाद<br>संपर्क क्र. ०२४० २३४३८८६ |

**अर्जासोबत जोडावयाची आवश्यक कागदपत्रे**

- पासपोर्ट साईज फोटो-२, जन्म तारखे करिता (वयाचा दाखला/१०वी ची टीसी/जन्म प्रमाणपत्र), फोटो आयडी-मतदान ओळखपत्र/आधार कार्ड इत्यादी, संपर्कासाठी स्वतःचा पत्ता व संपर्क क्रमांक, रहिवाशी प्रमाणपत्र, शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र, गुणपत्रिका, एमएमसी रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र, अनुभव प्रमाणपत्र, मुलाखतीच्या अनुषंगाने इतर कागदपत्रे मुळ व सत्यप्रत सांक्षांकित प्रत.

**(५) मुलाखतीची तारीख यथावकाश कळविण्यात येईल व अर्जाची छाननी करुन मुलाखतीसाठी पात्र उमेदवारांना बोलावण्यात येईल.**

- शासनाच्या मार्गदर्शक सूचने नुसार सर्व संबंधिताच्या निवडी बाबत कार्यवाही करण्यात येईल. निवड प्रक्रिया बाबत सर्व अधिकार (रदद करणे/ निवड करणे) मा.अध्यक्ष तथा आयुक्त यांचे राहतील.
- विशेषज्ञ या पदाच्या नियुक्तीबाबत निर्णय घेण्याचे अधिकार गठीत करण्यात आलेल्या समितीस राहतील.
- राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियानांतर्गत भरण्यात येणारी अर्धवेळ वैद्यकीय अधिकारी यांची निवड मुलाखत पध्दतीने करण्यात येईल.
- सदरील पदे ही औरंगाबाद शहर आरोग्य समिती यांच्या अंतर्गत केवळ ११ महिने कंत्राटी पध्दतीने भरली जात आहेत. त्यांचा औरंगाबाद महानगरपालिकेच्या आस्थापनेशी कसल्याही प्रकारचा संबंध राहणार नाही.
- एकुण पदांच्या संख्येमध्ये बदल होऊ शकतो.
- सदरील पदे ठराविक मासिक मानधनावर आहे.
- सदरील पदे ही निव्वळ कंत्राटी पध्दतीने केवळ प्रकल्प कालावधीपुरते असून प्रकल्प बंद होताच सदरील पदे आपोआप संपुष्टात येतील.
- निवड झालेल्या उमेदवारांना दिनांक : ३१.०३.२०२० पर्यंत नियुक्ती आदेश देय राहील व काम समाधानकारक असल्यास पुर्ननियुक्ती बाबत विचार करण्यात येईल.
- १० टक्के उमेदवारांची प्रतिक्षा यादी ठेवण्यात येईल.
- उमेदवारांनी मुलाखतीस येतेवेळी खालील कागदपत्रे सादर करावीत.

**(६) गुणदान हे शासनाने ठरविल्यानुसार अशा प्रकारे देण्यात येईल.**

| Sr.No. | Name of Candidate | Education Qualification | Additional Qualification | Experience | Subject knowledge | Total Marks |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | | 80 Marks | 5 Marks | 5 Marks | 10 Marks | 100 Marks |

पदव्युत्तर पदविका असल्यास अतिरिक्त १ गुण, पदव्युत्तर पदवी असल्यास अतिरिक्त २ गुण देण्यात येतील.

(७) ५ गुण अनुभवावर आधारित आहेत. दोन वर्षापेक्षाकमी अनुभव असल्यास-० गुण, २ वर्ष अनुभव असल्यास ३ गुण व पुढे प्रत्येक वर्षासाठी १ गुण यांप्रमाणे जास्तीत जास्त ५ गुण राहतील. अनुभवाच्या बाबतीत फक्त शासकीय, निमशासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था अथवा राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान अंतर्गत असणारा अनुभव ग्राहय धरला जाईल.

(८) उमेदवारांनी कुठल्याही प्रकारचा दबाव आणल्यास त्यांना मुलाखतीस व नियुक्तीस अपात्र ठरविण्यात येईल.

(९) नियुक्तीबाबतचा अंतिम अधिकार अध्यक्ष तथा आयुक्त, औरंगाबाद शहर आरोग्य समिती, महानरपालिका, औरंगाबाद यांनी राखून ठेवला आहे.

(१०) ही जाहिरात व अर्जाचा नमूना महानगरपालिकेच्या संकेत स्थळ www.aurangabadmahapalika.org वर उपलब्ध आहे.

(११) अर्ज करणाऱ्या उमेदवारावर कोणत्याही प्रकारचा फौजदारी गुन्हा, प्रशासकीय वित्तीय कार्यवाही, दंडात्मक कार्यवाही अथवा कुठल्याही प्रकारची गंभीर गुन्हयाची नोंद नसावी किंवा झालेली नसावी.